# राणा दाम्पत्यावर बरसले मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री

## महायुतीच्या उमेदवाराविरुध्द कारवाया थांबविण्याचा दिला इशारा



महासागर प्रतिनिधी

**अमरावती,( दि.12 )** - लोकसभेत झालेल्या पराभवाचा सुड उगविण्याकरिता महायुतित उघड कारवाया करित असलेल्या नवनित राणा व रवी राणांना हा प्रकार तातडीने थांबविण्याचा इशारा मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला. शिंदे दर्यापूर येथे आयोजित सभेत बोलत होते, तर अजित पवार अमरावती दौऱ्यावर असताना प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

### रवी राणा हे विनाशकाले विपरीत बुद्धी-अजित पवार



एका सभेत बोलताना रवी राणा यांनी अमरावतीची एक जागा निवडून आली नाही तर काही होत नाही, असे विधान सुलभा खोडके यांच्याबद्दल केले होते. रवी राणा यांनी केलेले हे विधान सध्या चर्चेत आले आहे. यावरून अजित पवारांनी रवी राणा यांना फटकारले असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी त्यांना समज द्यावी, असा सल्लाही दिला आहे. आज (दि.12) अजित पवार अमरावतीमध्ये आले असता त्यांना याबाबत प्रश्न विचारला. तेव्हा, त्यांनी आपली प्रतिक्रिया देत यावर भाष्य केले. अजित पवार म्हणाले, 'रवी राणा विनाशकाले विपरीत बुद्धी असल्या सारखे आहेत. त्यांच्याबद्दल न बोललेलं बरं. किंबहुना स्वत:च्या बोलण्यातून ते त्यांच्या पत्नीच्या पराभवाला कारणीभूत ठरले आहेत. शेवटी लोक बोलत असतात, आपण प्रत्येक गोष्टीला उत्तर द्यायचं नसतं. लोकांना फार नकारात्मक बोलेलं आवडत नाही. जनता सकारात्मक विचार करत असते.' याचबरोबर, 'आम्ही रवी राणा यांना दोनवेळा विधानसभेला पाठिंबा दिला आहे. मात्र, आमचा उमेदवार चांगला मताधिक्यानं विजयी करण्याचा प्रयत्न करत आहे. तो विजयी होणार आहे. तसेच, आनंदराव अडसूळ हे सुद्धा मला भेटले होते. त्यांनीही रवी राणा हे आपल्या विरोधात काम करतात,' असे त्यांनी सांगितले. हे बरोबर नाही. देवेंद्र फडणवीसांनी रवी राणांना समजावून सांगितलं पाहिजे. महायुतीत अंतर पडणार नाही, अशी काळजी घेतली पाहिजे,' असेही अजित पवार यांनी म्हटले आहे.

### 'महायुतीत राहून विरोधात काम करु नका'-शिंदे



दर्यापूरातील प्रचारसभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी खासदार नवनीत राणा आणि रवी राणा यांच्यावर निशाणा साधला. महायुतीत राहून महायुतीविरोधात काम करणाऱ्यांची नोंद घेतली जाणार असल्याचेही एकनाथ शिंदेंनी म्हटलं. 'महायुती मजबूतीने लढत आहे. महायुतीत कोणीही मिठाचा खडा टाकण्यातं काम करु नका. मी राणा परिवारालाही सांगतो की, तुम्ही महायुतीचे घटक आहात. महायुतीत सरकार तुमच्या पाठीशी उभं राहिलं आहे. आपण देखील महायुतीची शिस्त पाळली पाहिजे. महायुतीत राहायचं आणि महायुतीच्या विरोधात काम करायचं हे कोणी करता कामा नये. मुख्यमंत्री म्हणून मी हे आवाहन करत आहे,' असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं.

# ट्रॅक्टरच्या धडकेत दुचाकीस्वार ठार, एक गंभीर

## सायवाडा ते खेड रस्त्यावर अपघात


महासागर प्रतिनिधी

**मोर्शी, ( दि.12 )** - दुचाकी आणि ट्रॅक्टरमध्ये झालेल्या अपघातात एका 29 वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाला असून गंभीर अवस्थेत असलेल्या दुसऱ्या युवकाला उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथून जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. ही घटना दि.12 नोव्हेंबर रोजी काळी 10 वाजता सायवाडा ते खेड रस्त्यावर घडली. मृतक युवकाचे नाव किरण उईके (वय 29 वर्ष) असे आहे.

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार सायवाडा येथील किरण उईके (वय 29) व त्याचा सहकारी गोविंदा युवनाते (वय 26) हे दोघे मोटरसायकल क्र. एम एच 27/एके 3301 ने सायवाडा येथून खेड येथे मजुरी कामाकरीता जात असतांना खेड येथून विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रॅक्टरच्या पेरणी यंत्राची धडक मोटरसायकल स्वाराला बसली. या अपघातात किरण उईके याचा जागीच मृत्यू झाला. गाडीवर बसलेला दुसरा युवक गोविंदा युवनाते याला गंभीर मार बसल्याने दोन्ही युवक रक्ताच्या थारोळ्यात पडले आहे, अशी माहिती मोर्शी पोलीस स्टेशनला मिळताच पोलीस उपनिरीक्षक अमोल बुरुकुल व त्यांची अधिनस्त टीम यांनी घटनास्थळी धाव घेऊन दोघांनाही तात्काळ उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे हलविले. गंभीर अवस्थेत असलेल्या गोविंदा युवनाते या युवकावर उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी औषधोपचार केल्यानंतर त्याला अमरावती येथे जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृतक युवकाच्या पार्थिवावर शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात दिले.मोर्शी पोलिसांनी या प्रकरणी ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा नोंद केला असून ट्रॅक्टर ताब्यात घेण्यात आला आहे.

# पत्नीच्या हत्येच्या प्रयत्न करणाऱ्या पतीला जन्मठेप

## अमरावती जिल्हा सत्र न्यायालयाचा निर्णय



महासागर प्रतिनिधी

**अमरावती,( दि.12 )** - पतीने पत्नीवर कुऱ्हाडीने वार केले आणि घर पेटवून देत पत्नीला जिवे मारण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणात अमरावती जिल्हा न्यायाधीश (क्रमांक 4) तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश एच.एल. मनवर यांच्या न्यायालयाने मंगळवारी आरोपी पतीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. बंडू भीमराव खडसे (53, रा. बुधागढ, भातकुली) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.

भातकुली येथील बुधागढ गावात राहणारे बंडू भीमराव खडसे हे पत्नी, दोन मुले आणि आईसह राहतात. 6 जानेवारी 2006 रोजी बंडूचा पत्नीशी वाद झाला आणि त्याने पत्नीच्या डोक्यात कुऱ्हाडीने वार करून तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या घटनेच्या तक्रारीवरून खोलापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. या गुन्ह्याचा तपास पूर्ण झाल्यानंतर पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. याप्रकरणात 25 जानेवारी 2007 रोजी आरोपी बंडू खडसे याला पाच वर्षांची शिक्षा झाली होती. शिक्षा भोगून बाहेर आल्यानंतर आरोपीने 10 जानेवारी 2019 रोजी रात्री पुन्हा पत्नी सुनंदा हिच्या डोक्यात कुऱ्हाडीने वार करून तिला जखमी केले आणि त्यानंतर घराला आग लावली. आजूबाजूच्या लोकांनी तातडीने आग विझविली आणि जखमी सुनंदा यांना वाचवले. या प्रकरणाची फिर्याद आरोपीचा मुलगा मोहन याने 11 जानेवारी 2019 रोजी खोलापूर पोलिस ठाण्यात दिली होती. तक्रारीवरून सहायक पोलिस निरीक्षक विजय आर. शिंगाडे यांनी तपास सुरू करून आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. बंडू खडसे यांच्यावरील आरोप सिद्ध करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकिल मिलिंद जोशी यांनी एकूण आठ साक्षीदार तपासले. तक्रारदार आरोपीचा मुलगा फितूर झाल्याने त्याची पुन्हा चौकशी करून सत्य न्यायालयासमोर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला.

सरकारी बाजूने तपासण्यात आलेले पुरावे आणि युक्तीवादानंतर आरोपी बंडू भीमराव खडसे हा दोषी आढळल्याने त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. तसेच 20 हजार रुपयांचा दंडही ठोठावला. दंड न भरल्यास सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. दंडाची रक्कम जखमी पत्नीला भरपाई म्हणून देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

# दुचाकीचा अपघातात एक गंभीर

## अंबिका लॉन्स समोरील घटना

महासागर प्रतिनिधी

**परतवाडा,( दि.12 )** - परतवाड्यावरून धारणी मार्गे जात असताना एक दुचाकीस्वार रस्त्यावर आडवा ठेवलेल्या झाडाच्या खोडावर आदळल्याने अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना येथील धारणी रोडवर असलेल्या अंबिका लॉन्सच्या समोर सोमवारी (दि.11) सायंकाळी 7 वाजता दरम्यान घडली.

प्राप्त माहितीनुसार विजय बेठेकर (वय 24 रा. खडीमल) हे आपल्या सहकार्यासोबत परतवाड्यावरून धारणी मार्गे होंडा शाईन कंपनीची एमएच 27/बीपी 3352 क्रमांकाच्या दुचाकीने निघाले होते. दरम्यान अंबिका लॉन्स समोर रस्त्याचे काम चालू असल्याने काम करणाऱ्या कंट्राक्टदाराने रस्त्यावरच आडवे टाकलेल्या एका झाडाचे खोडाला दुचाकी धडकली. कुठलेही सुचना फलक येथे नव्हते. रात्रीच्या अंधारात तसेच समोरून येणाऱ्या वाहनांच्या लाईटच्या प्रकाशाने दुचाकीस्वार विजय याला हे झाडाचे खोड न दिसल्याने तो सरळ त्या खोडावर आदळला. या अपघातात विजय गंभीर जखमी झाला असून त्याला तात्काळ अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर विजयला पुढील उपचाराकरिता अमरावती येथे रेफर करण्यात आले. तसेच दुचाकी चांगलीच तूटफूटही झाली आहे. या अपघाताचा तपास ठाणेदार सुरेश म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रशांत जाधव व पोलिस कर्मचारी करीत आहेत.

### आडव्या खोडामुळे चौथा अपघात

या रस्त्याचे काम नगरपरिषदे मार्फत चालू असून, कंत्राटदराने काम चालू असताना रस्त्यावर आडवे कुठलेही बॅरिकेट्स न लावता झाडाची खोडे रस्त्यावर आडवी टाकली. तसेच तशा स्वरूपाचे कुठलेही सूचना फलकही लावलेले नाही. यापूर्वी सुद्धा याच आडव्या झाडाच्या खोडामुळे आतापर्यंत चार अपघात घडले आहे, हे विशेष.

### पालिका अभियंताचे असमाधानकारक उत्तर

कंत्राक्टदाराने काम चालू असताना कुठलेही बॅरिकेट्स तसेच सूचना फलक न लावता रस्ता बंद करण्याकरिता रस्त्यावर आडवे टाकण्यात आलेल्या झाडाबाबत नगर पालिकेच्या सहाय्यक अभियंता यांना विचारणा केली असता त्यांचे उत्तर समाधानकारक नव्हते.

# रूम पार्टनरने आठ लाख रुपये केले लंपास

**अमरावती** - पाणीपुरीच्या दुकानात एकत्र काम करणाऱ्या रूम पार्टनरने आठ लाख रुपये चोरल्याची घटना गाडगेनगर पोस्टेच्या हद्दीतील संतोषी नगर गल्ली क्रमांक 1 येथे घडली. पाणीपुरी व्यावसायिक प्रदीप किसनपाल साहू (27) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी राजकुमार साहू (रा. संतोषी नगर, गल्ली क्र. 1) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रदीप साहू आणि राजकुमार साहू हे दोघे एकाच दुकानात पाणीपुरीचे काम करतात. दोघेही संतोषी नगर गल्ली क्रमांक 1 मध्ये भाड्याच्या खोलीत राहतात. प्रदीप साहू याने बहिणीच्या लग्नासाठी पाणीपुरीच्या व्यवसायातून तीन वर्षांत एकूण आठ लाख रुपये जमा केले होते. राजकुमार साहू याला ही बाब माहिती होती. 10 नोव्हेंबर रोजी रात्री 11.30 वाजता राजकुमारने सांगितले की, माझ्या आईची तब्येत खराब आहे, त्यामुळे मी गावी जात आहे. त्यामुळे प्रदीप साहू राजकुमारला राजकमलच्या ऑटो स्टँडवर सोडून कामावर निघून गेला. मात्र काम आटोपून ते खोलीवर आले असता बॉक्सचे कुलूप तुटलेले दिसले. त्यातील आठ लाख रुपये गायब होते. त्यानंतर प्रदीप साहू यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. प्रदीप साहू यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी राजकुमार साहूविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# ऑर्डर पूर्ण करण्याच्या नावावर 124 ग्रॅम सोने घेऊन फरार

## सराफा व्यावसायिक खडेकर बंधुविरुध्द गुन्हा



महासागर प्रतिनिधी

**अमरावती,( दि.12 )** - सोन्याच्या दागिन्यांची ऑर्डर पूर्ण करण्यासाठी दुसऱ्या व्यावसायिकाकडून 124 ग्रॅम सोने घेऊन एक सराफा व्यावसायिक फरार झाल्याची घटना खोलापुरीगेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सराफा बाजारातील खरिया मार्केटमध्ये घडली.

रोहित अशोककुमार वालेचा (33, रा. भाजी बाजार) यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी सौरभ सुरेश खडेकर (34) आणि सुरेश खडेकर (60, दोघे रा. शारदा विहार) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रोहित वालेचा आणि सौरभ खडेकर हे एकमेकांच्या ओळखीचे आहेत. हे दोघेही सोने खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतात. आरोपी सौरभ खडेकर याने त्याला मिळालेली ऑर्डर पूर्ण करण्यासाठी रोहितकडून 8 लाख 14 हजार 839 रुपये किमतीची 118 ग्रॅम 350 मिली व 50 हजार 139 रुपये किमतीची 6 ग्रॅम 850 मिली सोने व 42 हजार 500 रुपये रोख असा एकूण 9 लाख 7 हजार 478 रुपये किमतीचा माल काही दिवसांसाठी घेतला. रोहितनेदेखील हे सोने आणि रोख रक्कम दुसऱ्या एका व्यावसायिका कडूनही घेतले होते. सोने आणि रोख रक्कम घेतल्यानंतर रोहितने फोन डायल केला असता सौरभचा फोन बंद असल्याचे दिसून आले आले. घरी जाऊन तपासणी केली असता तोही घरी आढळून आला नाही. सौरभने रोहितची फसवणूक करून माल घेऊन पळ काढला. रोहितच्या तक्रारीवरून खोलापुरीगेट पोलिसांनी सौरभ खडेकर आणि सुरेश खडेकर यांच्याविरुद्ध कलम 316 (2), 352, 3 (5) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# मेळघाटातील त्या सहा गावांचा विधानसभेवरही बहिष्कार

## लोकसभेमध्येही घातला होता बहिष्कार ● मूलभूत सोयीकरिता गावकरी पुन्हा आक्रमक



महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.12 )**- एकीकडे संपूर्ण राज्यात 2024 च्या विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होत आहे. मात्र, आदिवासी बहुल भाग असलेल्या मेळघाटातील सहा गावांनी मूलभूत सोयी सुविधा नसल्याने अमरावती लोकसभे निवडणूकीनंतर आता विधानसभा निवडणूकीवरही मतदानावर बहिष्कार टाकला आहे. अतिदुर्गम आदिवासी बहुल भाग असलेल्या धारणी तालुक्यातील रंगुबेली, धोकळा, कुंड, खामदा-किन्हीखेडा आणि खोपमार या सहा गावांचा त्यामध्ये समावेश आहे.

लोकसभेप्रमाणेच विधानसभेतही मेळघाटमधील सहा गावातील ग्रामस्थांनी मतदान करण्यास नकार दिला आहे. या गावांमध्ये रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा आदी मूलभूत सोयी सुविधा नाहीत. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाकडे तक्रारी करूनही कुठलीच दखल घेतली जात नाही. आम्ही विधानसभा निवडणुकीत मतदान करणार नाही, अशी भूमिका घेत निवडणुकीवर बहिष्कार टाकला आहे. दरम्यान प्रशासनाच्या वतीने गावातील ग्रामस्थांना मतदान करण्यासाठी समजाविण्यात प्रयत्न करित आहेत. मात्र, ग्रामस्थ आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. विशेष म्हणजे यावेळेस मेळघाट हा अतिदुर्गम भाग असल्याने सर्वाधिक 354 मतदान केंद्र येथे प्रशासनाच्या वतीने निश्चित करण्यात आले आहे.

# कॉँग्रेसला सत्तेसाठी तुष्टीकरण महत्वाचे वाटते

## योगी आदित्यनाथांचे खर्गेंना सडेतोड प्रत्युत्तर



महासागर प्रतिनिधी

**अचलपुर,( दि.12 )** - भगवे कपडे परिधान करणाऱ्या योगींसाठी देश प्रथम येतो. तर कॉँग्रेस सत्तेसाठी तुष्टीकरण महत्वाचे वाटते अशी टीका उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केली. ते आज, मंगळवारी अचलपूर येथे भाजप उमेदवार प्रविण तायडे आणि मेळघाट मतदारसंघातील भाजप उमेदवार केवलराम काळे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलत होते.

कॉँग्रेस प्रमुख मल्लिकार्जुन खर्गे नुकतेच झारखंडमधील एका सभेत ते म्हणाले होते की, अनेक साधू आता राजकारणात आले आहेत आणि भगवे कपडे घालून समाजात द्वेष पसरवत आहेत. %बटेंगे तो कटेंगे' असे विधान कोणताही संत देऊ शकत नाही. अशी विधाने दहशतवादी करू शकतात, असेही खर्गे म्हणाले होते. खर्गेंनी केलेल्या टीकेवरून संत समाज आणि राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया पुढे येऊ लागल्या आहेत. अशातच मंगळवारी अचलपूर येथे एका निवडणूक सभेला संबोधित करताना उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी खर्गेंना जोरदार प्रत्युत्तर दिले. योगी म्हणाले की, %मी योगी आहे आणि योगींसाठी देश प्रथम येतो. तर मल्लिकार्जुन खर्गे आणि कॉँग्रेससाठी तुष्टीकरण सर्वात महत्त्वाचे आहे. गेल्या 3 दिवसांपासून कॉँग्रेसचे अध्यक्ष माझ्याबद्दल नकारात्मक बोलत आहेत, मी म्हणतो, योगींसाठी देश प्रथम येतो. परंतु तुमच्यासाठी कॉँग्रेसचे तुष्टीकरण प्रथम येते. याप्रसंगी योगींनी सांगितले की, मल्लिकार्जुन खर्गे यांचे गाव एकेकाळी हैदराबादच्या निजामाच्या अधिपत्याखाली होते. भारत इंग्रजांच्या अधिपत्याखाली असताना कॉँग्रेसचे नेतृत्व मुस्लिम लीगच्या पाठीशी उभे होते आणि त्याच काळात मुस्लिम लीग आणि निजामाच्या रझाकारांनी हिंदूचे शिरकाण केले होते. याच आगीत मल्लिकार्जुन खर्गे यांचे गावही जळून खाक झाले. ज्यात खर्गेंची आई. बहीण आणि कुटुंबातील इतर सदस्यांचा मृत्यू झाला होता, परंतु, आपल्या कुटुंबाच्या बलिदानाबद्दल खर्गे कधीच काही बोलत नाहीत. कारण खरे बोलल्यास कांग्रेसला मिळणाऱ्या मुस्लिम मतांमध्ये घट होईल हे माहीत आहे, असा टोला योगींनी लगावला, खर्गेंनी आपल्या आयुष्यात 'बटेंगे तो कटेंगे' या विधानाचा प्रत्यय घेतला आहे, संत हा सगळ्या जनतेला सत्य सांगतो. त्यामूळे 'बटेंगे तो कटेंगे' चे महत्व विषद करण्याची गरज असल्याचे योगी आदित्यनाथ यांनी सांगितले.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# तिहेरी लढतीत कोण ठरताहे बलाढ्य?

## कानोसा अचलपूर विधानसभा मतदारसंघाचा

*महासागर प्रतिनिधी*

*परतवाडा,( दि.12 )- परिवर्तन महाशक्तीच्या रुपाने राज्यात 'किंगमेकर' होण्याच्या तयारीत असलेले ओमप्रकाश उर्फ बच्चू कडूंमूळे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष अचलपूर विधानसभा मतदारसंघातील लढतीवर लागले आहे. दोन दशकं अचलपूर मतदारसंघाचे सतत नेतृत्व करित असलेले प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू, दोन वेळा पराभव झाल्यानंतर पुन्हा एकदा नशीब आजमावित असलेले काँग्रेसचे बबलू देशमुख आणि पक्षातूनच ज्यांच्या उमेदवारीला पहिल्या दिवसापासून विरोध झाला असे भाजपचे प्रविण तायडे असे तिघांमध्ये लढत दिसत आहे. या तिहेरी लढतीमध्ये नेमकं कोण बलाढ्य ठरत आहे, हे बघण्यासाठी प्रचाराच्या दृष्टीकोनातून पक्ष बांधणी, नियोजन, कार्यकर्त्यांवर टाकलेली जबाबदारी याचा कानोसा 'महासागर' ने घेतला. ज्यातून नेमकं कोण बाजी मारु शकते याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.*







थेट जनसामान्यांच्या प्रश्नांना हात घालायचा, आणि लोकांची मनं जिंकायची हा प्रहार पक्षाचा फंडा राहीला आहे. सामाजिक कार्य करत असताना उभी केलेली कार्यकर्त्यांची 'प्रहार फौज' निवडणूकीमध्ये चोख काम करताना दिसत आहे. पक्षाअंतर्गत कलह, धूसपूस चव्हाट्यावर न येवू देता जागच्या जागी क्षमवून सर्वजण एकदिलाने काम करित असल्याचे दिसत आहे. कुणाचे मतदान कोणत्या केंद्रावर आहे, येथपासून कोणती प्रचार गाडी कोणत्या गावात फिरत आहे, येथपर्यंत अपडेट माहितीवर प्रत्येक कार्यकर्त्यांची नजर आहे. मतदार संघात उभारण्यात आलेल्या प्रचार कार्यालयातून जनसंपर्काचे नियोजन सुरु आहे. मतदारसंघात दिव्यांग किती ?, पोस्टल बॅलेट किती ?, गृह मतदान किती ? या सर्व प्रक्रीयेवर बारकाईने लक्ष ठेवत ते प्रहारच्या पदरात कसे पाडून घेता येईल, याचेही सुक्ष्म नियोजन 'प्रहार फौज' करित आहे. गेल्या वीस वर्षात, विशेषत- गेल्या पंचवार्षिकमध्ये मतदारसंघात बच्चू कडू यांनी केलेल्या विकास कामांचा लेखाजोखा विविध माध्यमातून मांडण्याचे काम कार्यकर्त्यांच्या एका चमूकडून केल्या जात आहे. जातीपातीतील, धर्माधर्मातील मतविभाजन रोखण्याकरिता काय प्रयत्न करता येईल यावरही काही प्रहारी काम करताना दिसत आहे.

### काँग्रेसच्या नियोजनाचाही आढावा

सलग तिसऱ्यांदा अचलपूर मतदार संघात काँग्रेसकडून रिंगणात असलेले उमेदवार बबलू देशमुख यांच्या नियोजनाचाही आढावा घेण्यात आला. चांदूर बाजार, परतवाडा येथे काँग्रेसचे प्रचार कार्यालय आहे. काही गावांमध्ये बुथ आहेत, परंतू कार्यकर्ते व प्रचाराच्या नियोजनाचा अभाव काँग्रेसकडे दिसत आहे. गेल्या दोन निवडणूकांमध्ये पैसा वाया गेल्याने, बबलु देशमुखांच्या काँग्रेसचा हात याबाबतीत आवरता दिसत आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार असताना मित्र पक्षही देशमुखांच्या प्रचारातून बाहेर असल्याचे जाणवत आहे.

### भाजप मनधरणीतच व्यस्त

उमेदवारी घोषीत झाल्यापासून भाजपचे उमेदवार यांना विरोधाचे ग्रहण लागले. दुसरीकडे प्रमोद गड्रेल यांच्या रुपाने झालेल्या बंडखोरीपासून वाचण्याचा प्रयत्न केला जात आहे. कार्यकर्त्यांच्या मनातला उमेदवार मिळाला नसल्याने मन मारुन भाजपचे काम कार्यकर्ते करित आहे. ते पैसेच खर्च करित नाहीत, मग आम्ही कसे काम करायचे ? अशी बोंब मारणारा एक कार्यकर्त्याचीही भेट झाल्याने कार्यकर्त्यांचे दुखणे थोडक्यात समजले. प्रचार कार्यालयाच्या उद्घाटनाला उशिर झाल्याने नियोजनालाही उशिर होत आहे. उमेदवाराचा अर्ध्याहून अधिक वेळ नाराज लोकांची मनधरणी करण्यात खर्ची पडत असल्याने प्रचाराचे नियोजन पुरते कोलमडलेले दिसत आहे.

### राज्यभर दौरा, तरी प्रचार अबाधित

परिवर्तन महाशक्ती नावाने तिसरी आघाडी घेवून निवडणूकीत उतरलेल्या बच्चु कडू यांनी महाराष्ट्रभर आपले उमेदवार उभे केले आहे. या उमेदवाऱ्यांच्या प्रचारार्थ ते आपला मतदारसंघ सोडून महाराष्ट्रभर दौरा करित आहेत. मात्र त्यांचे कार्यकर्ते बच्चु कडूंच्या अनुपस्थितीचा कुठेच परिणाम पडू देत नाहीत. तिन्ही प्रमुख उमेदवारांच्या नियोजनाची चाचपणी केली तर संपुर्ण अचलपूर मतदारसंघात सध्यास्थितीला बच्चु कडू प्रचारात आघाडीवर असल्याचे दिसत आहे.



# बडनेरा मतदारसंघात घराघरात परिवर्तनाचा उत्साह-प्रिती बंड

## मतदारांची स्वयंस्फुर्तीने पदयात्रेत उपस्थिती

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.12 )-** 'अकेले ही चले थे जानिब-ए-मंज़िल मगर, लोग साथ आते गए और कारवां बनता गया' हा शेर हुबेहुब वास्तवात उतरावा अशी परिस्थिती सध्या बडनेरा मतदार संघात आहे. येथे घराघरात परिवर्तनाचा उत्साह आणि उत्सव साजरा होत आहे. अपक्ष म्हणून लढतांना घेतलेली रिक्स जनता स्वत- संधीत परिवर्तीत करित आहे. 'अभी नही तो कभी नही' म्हणत मतदारसंघातील सर्व जाती धर्माचे लोग स्वयंप्रेरणेने 'ऑटो' या चिन्हाच्या प्रचाराकरिता रस्त्यावर उतरले आहे, ही ऐतिहासिक बाब असून माझ्या रुपाने जनता पुन्हा एकदा दिवंगत माजी आमदार संजय बंड यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी झाली असल्याचा मजबूत विश्वास प्रिती बंड यांनी व्यक्त केला.

'ऑटो' या बोधचिन्हावर अपक्ष लढत असलेल्या प्रिती संजय बंड यांनी मंगळवार(दि.12) महाविर नगर परिसरात पदयात्रा केली. यावेळी त्या माध्यमांशी बोलत होत्या.



### इतर उमेदवारांचे एक पाऊल मागे

मूजोर, हुकुमशहा प्रस्थापितांना घरी बसविण्याची ताकद फक्त प्रिती बंड यांच्यातच असल्याचा आत्मविश्वास मतदारांमध्ये असल्याने ते स्वयंस्फुर्तीने प्रिती बंड यांच्या प्रचारार्थ बडनेरा मतदारसंघातील गल्ल्यांगल्ल्या पालथ्या घालत आहे. त्यांना वाढता जनाधार पाहून प्रस्थापित आमदाराच्या पायखालची वाळू सरकताना दिसत आहे. दुसरीकडे बडनेरा मतदारसंघात प्रिती बंड यांच्या पाठीमागे असलेला जनाधार पाहून इतर उमेदवार प्रचारातून आपले एक पाऊल मागे घेताना दिसत आहे.

महाविर नगर परिसरातील स्वामी समर्थ मंदिरापासून सुरुवात करुन इंद्रायणी कॉलनी, न्यू प्रभात कॉलनी, चक्रधर नगर, देशपांडे प्लॉट, महाविर नगर, शिवशक्ती नगर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा, शिवाजी नगर, चवरे नगर, जय नगर, सरोज कॉलनी अशी ही पदयात्रा काढण्यात आली. गणेश नगर येथे या पदयात्रेचा समारोप करण्यात आला. पदयात्रेदरम्यान प्रिती बंड यांना नवोदित ते वृध्द असा सर्वच स्तरातील मतदार स्वतऱ्हून भेटत होता. विजय आपलाच असा आत्मविश्वास त्यांच्या उरी जागवित होता.

# तुम्ही सेटींग करता तसे सर्वचजण करित नाही!

## सुषमा अंधारेंच्या आरोपावर प्रिती बंड यांचे प्रत्युत्तर

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 )-** तुम्ही बडनेरा मतदार संघात आणलेली शिवसेनेची तिकीट कुणासाठी, कशासाठी आणि का ? आणली हे सर्वश्रुत आहे. तुमच्या या सेटींगचा लाभ कुणाला द्यायचा होता, हे जनतेला माहित आहे. त्यामूळे तुमच्या सारखी सेटींग सर्वचजण करतात, असे तुम्हाला वाटते. असे प्रत्युत्तर अपक्ष उमेदवार प्रिती बंड यांनी शिवसेना (उबाठा) नेत्या सुषमा अंधारे यांना दिले. प्रिती बंड यांना रवी राणा यांनी उभे केले, असा आरोप सुषमा अंधारे यांनी मंगळवारी (दि.12) एका सभेतून केला होता. इतकेच नाहीतर राणा यांनी इतर अपक्ष उमेदवार हे प्रिती बंड यांना लाभ पोहोचवून सुनिल खराटे यांना पराभूत करण्याकरिता उभे केले आहे, असा आरोप केला होता. यावर प्रिती बंड प्रत्युत्तर देताना बोलत होत्या.



## प्रा. गजाननराव काळे यांना मातृशोक

**अमरावती** - विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावतीचे संस्थापक सदस्य शंकरराव काळे यांच्या पत्नी तसेच संस्थेचे कार्यकारिणी सदस्य प्रा.गजाननराव काळे यांच्या आई यमुताई यांना दि.11 नोव्हेंबर 2024 ला सायंकाळी देवाज्ञा झाली. अंत्ययात्रा त्यांचे राहते घर शारदा विहार कृष्णार्पण कॉलनी येथून दि. 12 नोव्हेंबर 2024 रोजी सकाळी 11 वाजता हिंदू स्मशानभूमी करिता निघेल.



# डॉ. निलेश विश्वकर्मा यांच्या पदयात्रांचा धडाका

## धामणगाव रेल्वे तालुक्यात विविध भागात प्रचार

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे,( दि.12 )** - धामणगाव रेल्वे मतदार संघाचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. निलेश विश्वकर्मा यांनी निवडणूक प्रचाराचा चांगलाच धडाका लावला आहे. रिंगणातील उमेदवाराचे प्रेशर वाढवण्यासाठी आम्ही सिलेंडरलाच मतदान करण्याचा निर्धार महिला, पुरुष व तरुण वर्गाने बोलून दाखविला आहे.

डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी गावोगावी जाऊन मतदानाचे अभिवादन स्विकारले. यावेळी त्यांचा पदयात्रेला नागरिकांनी उत्कृष्ट प्रतिसाद दिला. डॉ.निलेश विश्वकर्मा धामणगाव रेल्वे तालुक्यातील निंभोळी, तळणी, निभोरा बोडखा, सोनेगाव, विटळा, देवगाव, आजनगाव, सुलतानपुर, सावळा, आसेगाव, नारगावंडी ,देवगाव येथून प्रचाराचा शुभारंभ झाला. धामणगाव रेल्वे मतदार संघाचे परिवर्तन घडवून मतदार संघाचा विकास करून आपण निवडणूक मैदानात असल्याचे त्यांनी मतदारांना सांगितले. दरम्यान आपल्या विकासाचे सर्वसमावेशक व्हीजनही त्यांनी मतदारांपुढे सादर केले. डॉ.निलेश विश्वकर्मा यांची आंदोलने, सेवा कार्य, रोजगार व विकास कार्यावर असलेला जनतेचा विश्वासाचे प्रतीबिंब त्यांच्या प्रचार रॅलीत उमटत आहे. त्यांच्या या पदयात्रेमूळे धामणगाव तालुक्यात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांनी ही उत्फूर्त प्रतिसाद देत आमचे मत विकासाला असून डॉ. निलेश विश्वकर्मा यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे आश्वासन नागरिक देत आहे. विकासाच्या ध्येयाशी जोडलेली ही भावनिक साद मतदारांच्या हृदयात नवीन उर्जा आणि आशा निर्माण करत असल्याचे दिसून येत आहे. रॅलीमध्ये देवगाव येथील दिलीप रंगारी, सुभाष रंगारी, शंकर पाटील, रमजान शेख जाकीर, दीरपुर येथील तेजस सवई, अरुण लोखंडे, मदन लोटे, संजय चोरे, गजानन मानकर, रवी गावंडे, सावळा येथील सचिन मून, मंगेश भोगुलकर, मीना ढगरे तर नारगवंडी येथील भुजबळ रंगारी, ज्ञानेश्वर मेश्राम, दिलीप डोखने, साहेबराव वाहने, वैभव कांबळे, दादाराव कांबळे, राजेश माने, रमेश पाटील यांच्यासह शेकडो कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.



# नाफेडद्वारे सोयाबिन खरेदीचा शुभारंभ



बारदाना प्राप्त होताच सोयाबीन खरेदीला सुरुवात

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे,( दि.12 )** - चांदुर रेल्वे तालुका खरेदी-विक्री संघामार्फत शासकीय सोयाबिन खरेदीचा नाफेड द्वारे शुभारंभ शेतकरी भवनच्या मागे डी.एम.ओ.गोडावून चांदुर रेल्वे येथे आज दि.12 नोव्हेंबर 2024 ला करण्यात आला. चांदुर खरेदी विक्री संघात सोयाबिन खरेदीबाबत शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करण्यात आलेल्या 20 शेतकऱ्यांना मोबाईलद्वारे मॅसेज देण्यात आला. त्यापैकी एकच शेतकरी सोयाबिन खरेदीला हजर झाले. हजर असलेल्या सुमित मुंडवाईक धानोरा मोगल शेतकऱ्यांना काटा पुजन करुन खरेदी-विक्री संघाचे मॅनेजर राहुल कोरडे यांनी शाल व श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ग्रेडर मनीष टेकाडे, प्रभाकर ईखार, गौरव आरेकर बाजार समितीचे संचालक सुरेश जाधव, सुभाष वानखडे शेतकरी मोठ्या संख्येने हजर होते. आजची सोयाबिन खरेदी 27 क्विंटल 50 किलो, एवढी खरेदी करण्यात आली. नाफेड द्वारे बारदाना विलंब आल्याने सोयाबिनची खरेदी लांबली होती. परंतु बारदाना येताच आज रोजी सोयाबिन खरेदीचा शुभारंभ करण्यात आला. त्या अनुषंगाने 20 शेतकऱ्यांना मोबाईल द्वारे मॅसेज देण्यात आला. परंतु नाफेडच्या 12 टक्के मॉचर आणि चाळणी लावण्याच्या जाचक अटीमुळे फक्त एकच शेतकऱ्यांनी आपला माल खरेदी केंद्रावर विक्री करीता आणला. खुल्या बाजारात 4000 सोयाबिनचा दर आहेत. नाफेडची सोयाबिन खरेदीचा दर 4892 आहे.

# मी गॅरंटीने सांगतो हे आदीवासी सुधारणार नाही!

## राजकुमार पटेलांचे डॉ. चिमोटेंवर गंभीर आरोप



**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा, ( दि.12 )-** मेळघाट विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार डॉ. हेमंत चिमोटे स्वत- आदीवासी असून ते आदीवासींनाच लुटतात. मी गॅरंटीने सांगतो की, हे आदीवासी कधी सुधारणार नाही. असे आरोप करित विद्यमान आमदार राजकुमार पटेल यांनी डॉ.चिमोटेंवर चांगले तोंडसुख घेतले. राजकुमार पटेल यांची नुकतीच पथ्रोट येथे एक जाहीर सभा झाली, त्यावेळी ते हे आरोप करित होते. राजकुमार पटेल म्हणाले की, हा उमेदवार काहीच करु शकत नाही, कारण त्यांच्या गावात दवाखाना मी आणला. राजाराम धिकार नामक एका आदीवासी रुग्णांकडून डॉ.हेमंत चिमोटे यांनी 1 लाख 36 हजार रुपयांचे बील काढले तेव्हा ते बिल न देवू शकल्याने त्यांची गाडी व शेत नावावर करुन देण्यासाठी विवश केल्याचा आरोप या जाहीर सभेतून वक्तव्य पटेल यांनी केला. यह आदीवासी सुधरेंगे नही असे भाष्य केल्यानंतर राजकुमार पटेल यांच्या वक्तव्याचा सर्वत्र निषेध होत आहे.



### काय म्हणाले चिमोटे

हेमंत चिमोटे म्हणाले कि, मी एक गरीब आदिवासी शेतकऱ्यांचा मुलगा असुन वैद्यकिय शिक्षण घेत गेल्या 7 ते 8 वर्षापासुन उच्च दर्जाची रुग्णसेवा अगदी नाममात्र शुल्क घेत करत आहे. राजकुमार पटेल यांनी बिनबुडाचे आरोप लावले आहे. मी कुठल्यातरी रुग्णाची बिलासाठी गाडी गहाण केली आहे. असा कुठलाच माझ्या रुग्णालयात उपचारासाठी आलाच नाही. त्या रुग्णाने शहरातील एका प्रतिष्ठीत रुग्णालयात उपचार घेतला. त्या रुग्णाचे बिल ही त्या हॉस्पीटलने माफ केल्याची माहिती पुढे आली आहे. पटेल यांना निवडणूकीत पराजय दिसत आहे. म्हणून बिनबुडाचे आरोप केले आहे. पटेल यांनी आदिवासी समाजाला खालच्या दर्जाची भाषा वापरली आहे. मी त्याचा निषेध करतो, मी पटेलांवर मानहानीचा खटला दाखल करणार असल्याचे हेमंत चिमोटे यांनी सांगितले.

# तिवसा विधानसभा क्षेत्रात तीन उमेदवारांना नोटीस

**अमरावती** - तिवसा विधानसभा मतदारसंघात नामनिर्देशित उमेदवारांच्या खर्चाची पहिली तपासणी शुक्रवार, दि. 8 नोव्हेंबर रोजी पार पडली. यात खर्च सादर केलेला नाही, अशा तीन उमेदवारांना नोटीस देऊन 48 तासाच्या आत खर्च सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. उमेदवारांच्या खर्चावर देखरेख ठेवण्यासाठी खर्च निरीक्षक म्हणून वेंकन्ना तेजावथ यांची नियुक्ती केली आहे. लेख्यांच्या पहिल्या तपासणीवेळी एकूण 16 उमेदवारांपैकी 2 उमेदवार अनुपस्थित राहिले. अनुपस्थित उमेदवारांना 48 तासांत निवडणूक खर्चाचे लेखे निवडणूक संनियंत्रण कक्ष, तहसिल कार्यालय, तिवसा येथे सादर करण्याबाबत नोटीस देण्यात आली. विहित मुदतीत खर्च सादर केला नसल्यास नियमानुसार तक्रार दाखल करण्यात येणार आहे. तसेच देण्यात आलेल्या सर्व परवानग्या तात्काळ रद्द करण्यात येणार आहे.

14 उमेदवारांनी पहिल्या तपासणीवेळी त्यांचा दैनंदिन खर्चाचा लेखा सादर केला. 11 उमेदवारांनी खर्च जुळलेला असून उर्वरित 3 उमेदवारांनी सादर केला नसल्यास शॅडो खर्चानुसार खर्च नोंदविण्यात येणार आहे. पहिल्या तपासणीअंती उमेदवारनिहाय खर्च हा तात्पुरत्या स्वरुपाचा असून निकालानंतर आयोजित लेखा ताळमेळ बैठकीमध्ये ताळमेळ घेऊन सदर खर्चास अंतिम स्वरुप देण्यात येणार आहे. अंतिम बैठकीनंतर खर्चाचा ताळमेळ झाल्यानंतरच सदरचा खर्च हा भारत निवडणूक आयोगास सादर केला जाणार आहे.


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी व माझे पक्षकार नामे नरेंद्र प्रभाकर पाटील आणि सुशीला नरेंद्र पाटील यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन मौजे बेनोडा, शेत सर्वे क्रं. 21/2, प्लॉट क्रं. 63, सब डिवायडेड प्लॉट क्रं. 63/1, ता. आणि जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नरेंद्र प्रभाकर पाटील आणि सुशीला नरेंद्र पाटील यांच्या मालकीचे आहे. तदनंतर, त्यांनी JM FINANCIAL HOME LOANS LIMITED. येथे गृह कर्जाकरीता अर्ज केला असता वरील वर्णनाचे मूळ खरेदीखत दि. 02/04/2012 रोजीचे दस्त क्र. 1774 सदर दस्त गहाळ झालेले आहे. तसेच वरील नमूद दस्त कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी//पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमतेवीषयी शासकीय-नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली देलेल्या माझ्या मोबाइल क्रं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

कोर्ट शिक्का

आपला
Advocate
रवींद्र र वाटाणे
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो. नं. 9823698745